नि.दि.दा.क्र.५३/२०१३.
(शिवाजी ए. विरुध्द विश्वनाथ त्रिं.)

## निशाणी १६ कडील आदेश.

प्रस्तुतचा अर्ज वादीने वाद मिळकती सर्व्हे क्र.१८०/१, १८०/२अ, १८०/२ब/१, १८०/२ब/२ या जमीनींची पोट हिस्स्याप्रमाणे मोजणी करुन हद्दीखुणा कायम करुन मिळण्याकरीता तालुका निरिक्षक भुमिअभिलेख यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक होणेबाबत केलेला आहे.

२. अर्जातील कथने अशी आहेत की, सर्व्हे क्र.१८० पैकी २ हे ४० आर क्षेत्र वादीने खरेदीने घेतलेले आहे. तसेच प्रतिवादीने देखील सर्व्हे क्र.१८० पैकीचे क्षेत्र खरेदीने घेतलेले आहे. सर्व्हे क्र.१८० मध्ये दक्षिणोत्तर बांध असून पश्चिमेकडुन पहिली वाटणी प्रतिवादी क्र.६ व ७ यांची असून त्यानंतर पुर्वेकडील उत्तर कोप-यातील सर्व्हे क्र.१८०/२अ मधील ७९ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.६ व ७ व त्यानंतर दक्षिणेस वादी क्र.५ चे क्षेत्र आहे. सर्व्हे क्र.१८०/२ब/१ मध्ये वादी क्र.१ ते ४ असून सर्व्हे क्र.१८०/२ब/२ मध्ये प्रतिवादी क्र.३ आहे. त्यामध्ये वादी व प्रतिवादी क्र.१ ते ५ रहात आहेत.

३. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी कैफियतीमध्ये वाद मिळकतीच्या चतु:सिमा चुकीच्या असल्याचे म्हटले आहे. सदर प्रतिवादींनी मुळ सर्व्हे क्र.१८० चे पोटहिस्सा फाळणी मोजणी झालेली नाही असे कथन केले आहे. त्यामुळे वाद विषयाचे निराकरण होण्याकरिता वादी व प्रतिवादी यांचे मालकी हिस्सा वहिवाटीप्रमाणे पोटहिस्सा मोजणी होऊन तसा मोजणी नकाशा दाखल होणे आवश्यक आहे. सबब सर्व्हे क्र.१८० मधील पोट हिस्स्यांची मोजणी होण्याकरिता न्यायालयीन आयुक्त म्हणुन उपअधिक्षक भुमिअभिलेख कर्जत यांची नेमणुक व्हावी अशी विनंती वादीने केली आहे.

४. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र.१ व २ यांनी निशाणी १८ कडे म्हणणे देऊन हरकत घेतली आहे. त्यांच्या कथनांप्रमाणे सर्व्हे क्र.१८० ची पोटहिस्स्यांसह मोजणी होऊन हद्दीखुणा कायम करुन मिळणेबाबत प्रस्तुतचा दावा दाखल झालेला आहे व तशी दाव्यामधील विनंती आहे. दाव्यातील मागणी या अर्जाद्वारे वादींना मागता येणार नाही. वाद मिळकतीची खरेदीखताप्रमाणे पोटहिस्से तयार झालेले आहेत. पोटहिस्सा मोजणी प्रत्यक्षपणे झाली नसल्याने वादीस पोटहिस्स्यांची मोजणी करुन मागता येणार नाही. वादींनी दिनांक १८.०८.२०११ रोजी मोजणी केल्याचे या दाव्यामध्ये कबुल केले आहे. त्यामुळे पुन्हा मोजणीकरिता अर्ज करता येणार नाही. सबब या सर्व कारणास्तव अर्ज नामंजुर करण्याची प्रतिवादींनी विनंती केली आहे.

५. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेख पडताळला.

६.		प्रस्तुत दावा वादींनी सर्व्हे क्र.१८० मधील जमीनीची पोटहिस्स्यांसह मोजणी होऊन हद्दीखुणा कायम करुन मिळणेबाबत आदेशाची मागणी होण्याकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करत असल्याचे दाव्यात कथन केलेले आहे. त्यामुळे सर्व्हे क्र.१८० मधील पोट हिस्स्यांची वहिवाटीप्रमाणे मोजणी व्हावी याकरिता सदरचा दावा दाखल केलेला आहे. अर्जामधील व दाव्यामधील कथने पाहता सर्व्हे क्र.१८० ची यापुर्वीच मोजणी झाली हे दिसून येते. वाद मिळकतींमध्ये वादी खरेदीखताने कब्जेवहिवाटीत असल्याचे कथन करतात. त्यामुळे सदरची कब्जेवहिवाट सिध्द करण्याची जबाबदारी वादींवर आहे.

७.		महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ मधील कलम १३२ च्या तरतुदीनुसार वाद मिळकतीची मोजणी करुन हद्दीखुणा निश्चित करणेकरिताचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत. तसेच कलम १३५ मधील तरतुदीनुसार याबाबतचे सर्व वाद निकाली काढण्याचे अधिकार क्षेत्र जिल्हाधिकारी यांचे आहे. त्यामुळे दिवाणी न्यायालयास याबाबत कोणतेही अधिकार दिलेले नाही. तसेच प्रस्तुत दावा मोजणी होऊन मिळणेकरिता व हद्दीखुणा निश्चित ठरवुन मिळणेकरीता केलेला असल्याने त्यामधील नमुद मागणी मिळविण्याकरिता दाव्यातील कथने पुराव्याद्वारे सिध्द करण्याची जबाबदारी वादींवर आहे. पुरावा पडताळुन गुणावगुणांवर दाव्याचा निकाल लागणे आवश्यक आहे. अशाप्रकारे मोजणी होऊन व हद्दीखुणा निश्चित होऊन मिळणेकरिता दाव्यातील मुळ मागणी या अंतरिम अर्जाद्वारे वादींना मागता येणार नाही.

८.		वर नमुद सर्व कारणांचा विचार करता अर्ज सद्यस्थितीत मंजूर होण्यास पात्र नाही. सबब, मी पुढील आदेश पारीत करित आहे.

## **<u>आदेश</u>**

अर्ज (नि.१६) खर्चासह नामंजुर करण्यात येतो.

दिनांकः- १३.१०.२०१५
कर्जत

सही/-
(आरती कुलकर्णी)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कर्जत.